स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठाच्या मानव विद्या शाखेअंतर्गत लोकप्रशासन विषयातील विदयावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधन विषय

"महाराष्ट्रातील महसूल प्रशासनाची भूमिका व बदलते स्वरुप - विशेष संदर्भ : मराठवाडा विभाग "

संशोधक

रतनसिंग मोतीसिंग साळोक

मु.पो. माहोरा ता. जाफ्राबाद जिल्हा जालना

मार्गदर्शक

डॉ. अमोल प्रभाकर काळे

सहाय्यक प्राध्यापक

लोकप्रशासन विभाग

पिपल्स कॉलेज नांदेड

संशोधन केंद्र

नेताजी सुभाषचंद्र महाविद्यालय, नांदेड.

मे, 2019

महाराष्ट्रातील महसूल प्रशासनाची भूमिका व बदलते स्वरुप : विशेष संदर्भ - मराठवाडा विभाग.

1. प्रस्तावना : (Introduction) :-

मानव समाजाच्या उत्क्रांतीच्या वेगवेगळया टप्प्यांवर वेगवेगळया सामाजिक संस्थाची निर्मिती मानवी समाजाने केली. उत्क्रांतीच्या प्रवाहात वेगवेगळया टप्प्यावर विशिष्ठ भूप्रदेशातील समाजाचा नियंत्रीत व संचलीत करण्यासाठी केंद्रीय / राजकीय संस्थाची निर्मिती झाली त्यांची, उदिष्टही काही प्रमाणात वेगवेगळी होती. मात्र त्यापैकी एक सर्वसामान्य उदिष्ट म्हणजे जनतेकडून कराच्या रुपाने महसूलाची वसूली करुन राजकीय व्यवस्था चालविणे हे होते व ही सर्व महसूल वसूलीची कार्यवाही करण्याची जबाबदारी महसूल विभागावर सुरुवातीपासून आहे त्यामुळे राजकीय व्यवस्था कोणत्याही प्रकारची असो " महसूलाची वसूली " ही सर्वात महतत्वाची बाब राहिल्यामुळे प्रारंभापासूनच महसूल विभाग शासन व्यवस्थेचा कणा राहिलेला आहे, ही बाब देशाच्या प्रशासकीय व्यवस्थेशी, राज्याच्या अथवा विभागाच्या किंवा जिल्हयाच्या तसेच शेवटच्या गावपातळीवरील घटकासाठी देखील लागू होते.

आजही महसूल विभाग हा राज्याच्या शासन व्यवस्थेचा कणा म्हणूनच कायम आहे. मात्र कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा पुरस्कार केल्यानंतर शासनाच्या कामकाजात मोठया प्रमाणात वाढ झाली व कल्याणकारी राज्याची संकल्पना साकार करतांना अनेक कल्याणकारी विभाग निर्माण करावे लागले. मात्र मूळ पोलीस राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचे कार्य पाहणारा गृह विभागही कायमच कार्यरत आहे. अशा प्रकारे अनेक विभाग निर्माण झाले व त्यामूळे महसूल विभागाचे आंतर विभागीय कामकाजात मोठया प्रमाणात वाढ झाली व एक मध्यवर्ती व समन्वयाची भूमीका महसूल विभाग पार पाडत आलेला आहे. हेच चित्र राज्य पातळीवर तसेच विभागीय पातळीवर व जिल्हा पातळीवर आजही दिसून येते.

आजपर्यंतच्या राजकीय संस्थाच्या इतिहास पाहिला असता राजकीय व्यवस्थेचा केंद्रभागी "भू" म्हणजेच 'जमीन' विषय कायम राहिलेला आहे. महसूल विभाग हा शासनव्यवस्थेच्या महत्वपुर्ण विभाग कायम असल्यामुळे जमीन / भूमी हा महसूल प्रशासनाचा देखील कायम मध्यवर्ती विषय राहिलेला आहे. भारतात कायदेशीर शासन यंत्रणांची निर्मिती झाल्यानतंर या संस्थानी स्वांतत्रपुर्व काळ व स्वातंत्रोत्तर काळात अनेक जमीन विषयक कायदे केले. हे कायदे सामाजीक सुधारणांशी पूरक होते.

मात्र अलिकडे काही बाबी जसे की, सामाजिक सुधारणा, आर्थिक विकास, औदयोगिक विकास, जमीन विषयाचा बदलता संदर्भ इ. अनेक गोष्टींमुळे या जमीनीविषयक कायदयामध्ये राज्य शासनाने अनेक बदल केलेले आहेत. हे कायदे कुळ, इनाम, वतन जमीन, कमाल जमीनधारणा इ. बाबींशी निगडीत असल्यामुळे या कायदयांच्या बदलता संदर्भाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील महसूल विभागाचे कामकाज हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 प्रमाणे चालते या संहितेनुसार व इतरही काही कायदे जसे की मालमतदार कोर्ट ॲक्ट, 1906 इ. कायदयानुसार महाराष्ट्रातील महसूल अधिकारी यांना अर्धन्यायीक कामकाज करावे लागते त्या कामकाजातील प्राधिका-यांची भूमिका इत्यादीचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक वाटते.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 खाली महाराष्ट्र जमीन महसूल (अधिकार अभिलेखे तयार करणे व सुव्यवस्थित ठेवणे) नियम 1971 नुसार महाराष्ट्रातील जमीन विषयक अधिकार अभिलेखे ठेवले जातात मात्र अलिकडे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी प्रगती झालेली आहे व शासनाने जाणिवपूर्वक अधिकार अभिलेख्यांचे संगणकीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. हे काम महाराष्ट्र व मराठवाडयात प्रगतीपथावर आहे त्याचाही मागोवा घेणे आवश्यक वाटते.

महसूल विभाग हा शासन व्यवस्थेचा कणा राहिलेला असल्यामुळे शासनाने जबाबदारीची धुरा देखील महसूल विभागाकडे जास्त झुकलेली ठेवलेली आहे. शासनाचे अनेक विभाग उदा. ग्रामविकास, रोजगार, आरोग्य, गृह, पाणीपुरवठा, सामाजिक न्याय इत्यादी अनेक विभागाच्या अनेक कामांचे नियंत्रण व समन्वयाचे काम महसूल विभागास करावे लागते.

अशा प्रकारे विविध स्वरुपाचे कामकाज महसूल विभागामार्फत केले जातात त्यामुळे कामाचा प्रचंड ताण महसूल अधिकारी / कर्मचारी यांचेवर असून विभागाच्या मूळ कामकाजाशिवाय कराव्या लागणा-या कामकाजाचे मोजमाप व मूल्यमापन करणारी वेगळी यंत्रणा दिसून येत नाही. त्यामुळे विभागा अंतर्गत अनेक अडचणी व समस्या निर्माण होत आहे व महसूल विभागाने मूळ कामकाज काहीअंशी बाधीत होत असल्याचे दिसून येते.

2. विषयाचे महत्व :-

महसूल विभाग हा राज्यातील शासन व्यवस्थेचा कणा आहे ही बाब निर्विवाद आहे. राज्यातील लोकांचा / नागरिकांचा सर्वाधिक संबंध महसूल विभागाशी येतो. त्यामुळे सर्वसामान्यांच्या समस्या व त्यांचे निरसन याचाही संबंध महसूल विभागाशी आहे. लोकाभिमुख शासन व्यवस्थेत महसूल प्रशासन महत्वाची भुमिका बजावतो त्यामुळे संशोधनाच्या या विषयांचे महत्व अन्यन्यसाधारण आहे. शासनाच्या विविध विभागाचे बरेचशा कामाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध महसूल विभागाशी येत असतो त्यामुळे एकंदर या विषयांचे महत्व सर्वसामान्य नागरीकांच्या दृष्टीने देखील अधिक आहे.

सर्वसामान्य जनता व नागरीकांचा व विशेषत: शेतकरी वर्ग यांचे सर्वात जिव्हाळयाचे विषय म्हणजे जमीन, जमीनीवरील पिके, जमीन महसूल, जमीनीचे अभिलेखे, शेतीपध्दती, शेतमालाचे विपणन, जमीन विषयक वाद, जमीन कसण्याच्या पध्दती, जमीन कसण्यास अडचणी इत्यादी सर्व विषयांचा संबंध महसूल विभागाशी येत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या तक्रारीचे निराकरण करणे ही बाब महसूल विभागाशी सर्वाधिक निगडीत असल्यामुळे संशोधनास अधिक वाव आहे.

3. समस्या सूचन :-

आजच्या राजकीय व्यवस्थेला सामान्य नागरीक केंद्र बिंदू असून सर्व व्यवस्था त्या सभोवताल फिरत असल्याचे दिसून येते. भारतात अजूनही बहूतांशी लोकसंख्या शेती व्यवसाय प्रथ्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गुंतलेली आहे. त्यामुळे शेतक-यांचा दैनंदिन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध महसूल विभागाशी येत असतो. त्यामुळे त्या सामाजिक घटकांच्या समस्यांचा निवारणाचा संबंध महसूल विभागाशी येत असल्यमुळे या विषयात संशोधनाची निकड वाटते. याशिवाय शासनाचे अनेक विभाग जसे की, गृह, ग्रामविकास, सामाजिक न्याय या लोकाभिमुख विभागाची काही कामे महसूल अधिकारी करीत असतात. पर्यायाने या विभागाशी संबंधीत समस्यांचा निराकरण करण्याचा विषयाचा संबंध देखील महसूल विभागाशी येत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेला तक्रारीचे निवारण करणेची बाब ही महसूल विभागाशी सर्वाधिक निगडीत

असल्यामुळे संशोधनास महसूल प्रशासनात अधिक वाव आहे असे जाणवले म्हणून मी " महाराष्ट्रातील महसूल प्रशासनाची भूमिका व बदलते स्वरुप विशेष संदर्भ मराठवाडा विभाग" हा विषय संशोधनासाठी निवडला.

<u>4. संशोधन पध्दती :-</u>

"महाराष्ट्रातील महसूल प्रशासनाची भूमिका व बदलते स्वरुप: विशेष संदर्भ मराठवाडा विभाग" हे विषय शिर्षक असून संशोधनाचे स्वरुप हे सामाजिकशास्त्र पध्दतीचे असेल या संशोधनात ग्रंथालयीन व क्षेत्रीय अध्ययन पदधत या दोन्ही पध्दतीचा वापर केला जाईल. संशोधनात विविध प्राथमिक व दुय्यम स्त्रोतातील माहितीचा आधार घेतला जाईल.

<u>5. अध्ययान क्षेत्र </u>:-

प्रस्तुत संशोधनामध्ये विशेषत: महाराष्ट्रातील महसूल प्रशासनाची भूमिका व या भूमिकेचे बदलते स्वरुप याचा अभ्यास करतांना मराठवाडा महसूल विभागाचा विशेष अध्ययन केले जाईल. आंतर विभागीय कामकाजातील महसूल विभागाची महत्वपूर्ण भूमिका, भूसुधारणा कायदयातील सुधारणा व शासनाचे बदलते जमीन विषयक धोरण, महसूल अधिका-यांसमोरील अर्धन्यायिक कामकाज तसेच अधिकार अभिलेख्यांची आधुनिक संगणकीकृत पध्दती व शेवटी महसूल विभागासमोरील समस्या अशी अध्ययनाची व्याप्ती असेल हे घटक अभ्यासात असतांना मराठवाडयामध्ये औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, नांदेड, लातुर, उस्मानाबाद व हिंगोली या जिल्हयांचा समावेश होतो.

<u>6. तथ्य संकलन :-</u>

माहिती संकलनासाठी खालील स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

<u>प्राथमिक स्त्रोत</u>

संशोधनासाठी माहिती संकलनासाठी प्राथमिक स्त्रोतांत मराठवाडयातील महसूल प्रशासनातील सेवारत, सेवानिवृत्त महसूल अधिकारी, अधिकार अभिलेख्याशी संबंधी तलाठी / मंडळ अधिकारी, अभ्यासक, अधिकार अभिलेखे ठेवणारे अभिलेखपाल यांच्याशी प्रश्नावली अनुसूची तयार करण्यात येईल व मुलाखतीचा वापर करण्यात येईल. त्याचबरोबर संबंधीत क्षेत्राचे प्रत्यक्ष निरीक्षण व सर्वेक्षणातून तथा संकलन केले जाईल. याशिवाय शासकीय कार्यालयातील अधिकार अभिलेखे व शासकीय दस्तऐवज,

मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च् न्यायालयांचे विविध न्याय निवाडयांचा संदर्भ अभिप्रेत आहे.

(ब) दुय्यम स्त्रोत :-

संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलनासाठी व्दितीय स्त्रोतांत अतंर्भुत, मासिके, त्रैमासिके, प्रसिध्दी साहित्य, वृत्तपत्रे, महसूल प्रशासनातील उपलब्ध अहवाल, इंटरनेट, ई-मेल इत्यादी स्वरुपात उपलब्ध माहितीचा आधार घेण्यात येईल.

7. संशोधनाची उद्दीष्टे :-

महाराष्ट्रातील शासन व्यवस्थेचा महसूल विभाग हा कणा राहिलेला अहे, हा विभाग अधिक सक्षम व्हावा सर्वसामान्य नागरीकांना या विभागाचा अधिक लाभ व्हावा. नागरीकांच्या समस्या निराकरणात महसूल विभागाच्या भूमिकेची चिकित्सा होऊन सर्वसामान्य लोकांना त्याची माहिती व्हावी. सर्वसामान्य नागरीक व धोरण निर्मिती करणारे वरिष्ठ अधिका-यांना महसूल विभाग निभावत असलेल्या विविध भूमिकांची माहिती व्हावी तसेच महसूल विभागात आधुनिक माहिती तंत्रज्ञान विषयाचा वाढता वापर हा लोकाभिमुख व्हावा या दृष्टीकोनातून खालील संशोधनाचे उद्देश ठेवण्यात आलेले आहेत.

1. महसूल विभाग शासन व्यवस्थेचा कणा कसा आहे हे तपासणे.
2. महाराष्ट्रातील शासन व्यवस्थेत आंतरविभागीय कामकाजातील महसूल विभागाच्या भूमिकेचा आढावा घेणे.
3. महाराष्ट्रातील भुसूधारणा कायदयातील सुधारणा व शासनाचे बदलते भूमी विषयक धोरण यांचा परिस्थितीसापेक्ष चिकित्सक अभ्यास करणे.
4. महसूल अधिका-यांचे अर्धन्यायिक कामकाजातील भूमिकेवर दृष्टीक्षेप टाकणे व कामकाजाची चिकित्सा करणे.
5. महसूल विभागाकडुन अधिकार अभिलेख्यांच्या ठेवण्याच्या आधुनिक पध्दती व त्यांच्या लोकाभिमुखतेचे परिक्षण करणे.
6. महसूल प्रशासनाच्या समस्यांचा आढावा घेऊन मुल्यमापन करणे.

8. संशोधनाची गृहितके :-

1. गृहीतक - 1 प्राचीन काळापासून जमीन महसूलाची वसूली करणे हे महसूल प्रशासन शासन व्यवस्थेत महत्त्वाचा विभाग राहिलेला आहे.
2. गृहीतक - 2 महाराष्ट्रात प्रशासनात आंतरविभागीय कामकाजात महसूल विभागाची भूमिका महत्त्वपुर्ण राहिलेली आहे.
3. गृहीतक - 3 जमीन ही एकमेव उद्देश्यासाठी राहिलेली नसल्यामुळे शासनाला जमीन विषयक धोरण व कायदयात बदल करणे आवश्यक ठरते.
4. गृहीतक - 4 कार्याचा वाढता भार व सुशासनाच्या रेत्यामुळे महसूल प्रशासनाला आधुनिक तंत्रज्ञान वापरासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न करावे लागतात.
5. गृहीतक - 5 महसूल प्रशासनावर शासनाच्या इतर विभागांच्या कामाचा भार दिवसेन दिवस अधिक वाढत आहे.
6. गृहीतक - 6 महसूल अधिकारी यांना दैनंदिन कामकाजात वेगवेगळया भूमिका निभवाव्या लागतात.

9. संशोधन आराखडा : -

संधोधनाचा अंतिम अहवाल लेखन शास्त्रीय पध्दतीने खालील प्रकरणांच्या माध्यमातून केले जाईल.

1. **प्रकरण पहिले :- प्रस्तावना व संशोधन पध्दती**.
2. **प्रकरण दुसरे :- महाराष्ट्रातील महसूल प्रशासन एक दृष्टीक्षेप**.

आधुनिक व प्राचीन अनेक शासन संस्थाच्या अभ्यास केला असता या शासन संस्थाच्या कामकाजात महसूल विभाग हा महत्वपुर्ण राहिल्याचे आपण पाहत आलेलो आहे. काळानुरुप त्यामध्ये कमी अधिक प्रमाणात काही बदल होत गेले, मात्र आजही महाराष्ट्र शासनाचा महसूल विभाग हा राज्याच्या राजकारभारात महत्वाची भूमीका बजावत असून त्याचे महत्व कमी झालेले नाही. या गोष्टीचा परामर्श या प्रकरणात घेण्यात येईल.

3. **प्रकरण तिसरे :- "महसूल प्रशासनाचा आंतरविभागीय संबंध"**.

आपण कल्याणकारी राज्य पध्दतीचा स्विकार केलेला आहे. त्यामुळे शासनास कल्याणकारी राज्याची उदिष्टे साध्य करण्यासाठी अनेक नवीन विभागांची निर्मिती करावी लागली. तसेच कल्याणकारी राज्य साकार करीत असतांना शासनाची " पोलीसी राज्यातील" कायदया व सुव्यवस्था संभाळण्याची भूमिका कमी झालेली नाही.

कायदा व सुव्यवस्थेच्या अनेक समस्या आजही कायम आहेत. अनेक सामाजिक समस्यांचा संबंध कायदा व सुस्वयस्थेशी येत असतो त्यामुळे आजही शासन व्यवस्थेचा गृह विभाग कायम असून त्याची भूमिका देखील अनन्यसाधारण आहे. या सर्व विभागांच्या आंतर विभागीय कामकाजात महसूल विभाग हा सर्वात महत्वाची भूमिका बजावत असतो म्हणजे या बाबीचा विचार करतांना महसूल विभागाचे स्थान मध्यवर्ती असल्याचे दिसून येते.

4. प्रकरण चौथे :- अर्धन्यायिक कामकाज व कार्यकारी दंडाधिकारी म्हणून भूमिका.

महसूल प्रशासनाच्या उत्क्रांतीचा अभ्यास केला असता “महसूल वसूली” हा प्रमुख हेतू होता. परंतु काळयाच्या ओघात अनेक कामे महसूल विभागाकडे देण्यात आली. स्वातंत्रपुर्व काळात व स्वातंत्रोत्तर काळात देखील विविध कायदे पारीत करुन अनेक प्रकारचे अर्धन्यायिक कामकाज सोपविण्यात आले. याशिवाय कायदा व सुव्यवस्था ही प्रथम पासुनच महत्वाची समस्या असल्यामुळे त्याअनुषंगाने गृहविभागाकडील काही कामे महसूल अधिका-यास कार्यकारी दंडाधिकारी या नात्याने पार पाडावी लागतात या दोन्ही भूमिका महत्वाच्या आहेत याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

5. प्रकरण पाच :- महसूल प्रशासन व अधिकार अभिलेख्यांची आधुनिक पध्दती (DILRM).

महसूल प्रशासनाची प्रथम पासून महत्वाची भूमीका ही महसूली वसूली हा राहिलेली आहे. त्यामुळे या वसूलीच्या अनुषंगाने विविध हिशोब व लेखे ठेवणे ही प्रथमपासूनच या विभागाच्या कामकाजाचा भाग आहे. मात्र याशिवाय जमीन ही देखील कोणत्याही राज्यव्यवस्थेतील सर्वात महत्वाची गरज राहिलेली आहे. भूभाग किंवा जमीनीशिवाय राज्य असू शकत नाही व प्रथमपासूनच जमीनीवर / म्हणजे पिकांवर महसूली आकारणी केली जात होती. त्यामुळे जमीनीचे रेकॉर्ड / अभिलेखे ठेवणे क्रमप्राप्त होते. कोणत्याही व्यक्तीवर / घटकावर महसूलाची आकारणी करण्यासाठी जमीनीच्या नोंदी ठेवणे आवश्यक होते.

मालकी हक्क हा देखील महत्वाचा घटक राहिलेला आहे. या सर्वाच्या गरजेतून अधिकार अभिलेखे, जमीनीच्या मोजणी व नकाशे इ. महत्वपुर्ण बाबींचा उगम झाला, त्या अभिलेख्याशिवाय कामकाज करणे महसूल विभागास अशक्य आहे. अलिकडे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती झालेली आहे व त्याचा मोठया प्रमाणात वापर महसूल विभागात करण्यात आला व आधुनिक संगणकीकृत

लोकाभिमुख अधिकार अभिलेखे पध्दतीचा वापर सुरु झाला व शासन मोठया प्रमाणात या पध्दतीचा पुरस्कार करीत आहे.

6. **प्रकरण सहा :- महसूल प्रशासनावरील अन्य विभागाचा भार**.

महसूल विभाग हा महाराष्ट्र शासन व्यवस्थेचा कणा राहिलेला आहे व आजही आहे. महसूल विभागाविषयी असेही बोलले जाते की, महसूल विभाग हा कोणत्याही कामास नाही असे म्हणत नाही. सामान्य प्रशासन विभागाचे निवडणूका हे अवाढव्य काम असो की, सामाजिक न्याय विभागाचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्याचे काम असो ही कामे महसूल विभाग अनेक वर्षापासून निरंतरपणे विनातक्रार करत आहे. शासनाच्या शेकडो समित्याचे प्रमुख हे विभागीय, जिल्हा, तालूका व गावपातळीवरील प्रमुख महसूल अधिकारी पदसिध्द अध्यक्ष / सचिव आहेत यावरुन या विभागाकडे शासनाने अन्य विभागांची किती कामे सोपविलेली आहेत याची कल्पना येते.

7. **प्रकरण सात :- महसूल प्रशासनाचे मुल्यमापन व निष्कर्ष**.

महसूल प्रशासन विभाग हा शासनाचा महत्वपुर्ण विभाग असल्यामुळे कामाचा व्याप देखील या विभागावर अत्याधिक प्रमाणात आहे. त्यामुळे प्रशासनातील अनेक समस्या हया महसूल प्रशासनाच्या समस्या बनलेल्या आहेत. महसूल प्रशासनात अनेक बाहय समस्यांना सामोरे जावे लागते त्याबरोबर या विभागाअंतर्गत देखील काही समस्या आहेत त्याचा परामर्श घेऊन निराकरण करणे आवश्यक आहे.

10. सारांश :-

महसूल प्रशासन हा महाराष्ट्र शासनाचा प्रशासन व्यवस्थेतील कणा आहे ही बाब निसंदेहपणे सिध्द होते. महसूल प्रशासनाकडे शासनाच्या अनेक विभागांशी कामे सोपविलेली आहेत. त्यामुळे या अन्य विभागांशी कामाचा समन्वय करतांना महसूल विभागातील अधिकारी यांची महत्वाची भूमिका असते. भूमी व महसूल हया सर्वात महत्वाच्या गोष्टी महसूल विभागाच्या अंतर्गत येतात. बदलत्या सामाजिक व आर्थीक परिस्थितीत जमीन सुधारणांच्या अनेक कायदयात काही बदल झाले. त्याचप्रमाणे शासनाचे देखील जमीन विषयक धोरण बदलत्या आर्थीक व सामाजीक परिस्थितीत काही अंशी बदललेले आहे. महसूल अधिकारी यांना प्रशासनातील

कामकाजाबरोबरच जमीनीचे अनेक वाद सोडवावे लागतात, विविध प्रसंगी अर्धन्यायिक कामकाज चालवावे लागतात तर काही प्रसंगी कार्यकारी दंडाधिका-यांचे अधिकार देखील वापरावे लागतात, अशा विविध भूमीका महसूल अधिकारी यांना बजावाव्या लागतात.

भूमी व भूमीची अभिलेखे तसेच जमीन महसूल वसूलीचे लेखे गावाची एकंदर सर्व माहितीचे संकलन करुन अदयावत ठेवण्याची जबाबदारी महसूल अधिका-यांची असते. अलिकडे अधिकार अभिलेखे ठेवण्याच्या पध्दतीत अमुलाग्र बदल होऊन मोठया प्रमाणात संगणकीकरण झालेले आहे. त्यासाठी अनेक नविन आज्ञावलींचा वापर करण्यात येत असून महाराष्ट्र शासनास या कामास महत्वाकांक्षी स्वरुप दिलेले आहे.

महसूल विभागाकडे शासनाची अनेक विभागाची महत्वपुर्ण काम सोपविलेली आहे. उदा. नागरी पुरवठा विभागाचे अन्न धान्य वितरण प्रणाली, सामान्य प्रशासन विभागाच्या निवडणूका हा विषय, सामाजिक न्याय विभागाचा विविध सामाजिक अर्थसहाय्य योजना व प्रमाणपत्राचे वितरण, गृहविभागाची विविध कामे अशी अनेक कामे महसूल विभागाकडे सोपविलेली दिसतात. मात्र ही सर्व महत्वाची कामे, इतर अन्य सोपाविलेली कामे त्याचबरोबर प्रशासनातील विविध नवीन समस्या हया महसूल विभागाच्या समस्या बनल्या आहे. महसूल विभागाच्या अंतर्गत समस्या व बाहय समस्या यांचे निराकरण करणे गरजेचे आहे.

<u>संदर्भ सूची :-</u>

1. Maheshwari S.R., 'Public Adminstration in India: The Higher Civil Service' OXFORD University Press, New Delhi, 2006.
2. First Administrative Reforms Commission Report, 1966-69.

3. चौधरी कि.का. " महाराष्ट्र : भुमि व लोक" महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, दर्शनिका, महाराष्ट्र शासन, 1966.

4. नागरीकांची सनद, महाराष्ट्र शासन महसूल विभाग विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

5. मासिके व वृत्तपत्रे, अहवाल, दैनिक सकाळ, दैनिक लोकसत्ता, दैनिक लोकमत, मिडिया, इंटरनेट इत्यादी.

6. Shriram Maheshwari, ' Indian Administration' Orient Longman Ltd., 1974.

7. यशदा पूणे यांनी प्रसिध्द केलेली पुस्तके.

मार्गदर्शक

डॉ. अमोल प्रभाकर काळे
सहाय्यक प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
पिपल्स कॉलेज नांदेड

संशोधक

रतनसिंग मोतीसिंग साळोक